RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ३६] गुरुवार, जुलै १३, २०१७/आषाढ २२, शके १९३९ [पृष्ठे ७, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ६८

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.— श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | पृष्ठे १–७ |

### विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ जुलै २०१७.

### MAHARASHTRA ORDINANCE No. XII OF 2017.

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE SHREE SAI BABA SANSTHAN TRUST (SHIRDI) ACT, 2004.

### सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

२००४ चा महा. १४. आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

त्याअर्थी, आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) अध्यादेश, २०१७, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये, खंड (ग) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— २००४ चा महा. १४.

"(ग-१) " मुख्य कार्यकारी अधिकारी " याचा अर्थ, समितीचा मुख्य कार्यकारी अधिकारी, असा आहे ;".

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ११ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ११ मध्ये,—

(क) पोट-कलम (२) मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, जेव्हा गणपूर्ती आवश्यक असेल मात्र गणपूर्ती होण्याइतके सदस्य उपस्थित नसतील तेव्हा, पीठासीन प्राधिकारी ती सभा तीस मिनिटांकरिता तहकूब करील आणि मूळ सभेची गणपूर्ती झाली असती तर तिच्यापुढे जे कामकाज चालविण्यात आले असते ते कामकाज, अशा तहकुबीनंतर, पुन्हा सुरू झालेल्या सभेपुढे चालविण्यात येईल आणि ते, अशा पुन्हा सुरू झालेल्या सभेमध्ये- मग तिची गणपूर्ती झालेली असो किंवा नसो, निकालात काढण्यात येईल. ";

(ख) पोट-कलम (५) मधील, " कार्यकारी अधिकारी " या मजकुराऐवजी, " मुख्य कार्यकारी अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम १३ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील,—

(एक) " कार्यकारी अधिकाऱ्याची " या मजकुराऐवजी, " मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) परंतुकामध्ये, " कार्यकारी अधिकारी " हा मजकूर जेथे जेथे आला आहे तेथे तेथे त्याऐवजी, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह " मुख्य कार्यकारी अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (२) मुख्य कार्यकारी अधिकारी हा भारतीय प्रशासकीय सेवेच्या संवर्गातील अधिकाऱ्यांमधून निवडण्यात येईल :

परंतु, असा अधिकारी हा, श्री साईबाबांचा भक्त असेल आणि तो विहित नमुन्यात तसे प्रतिज्ञापत्र करील :

परंतु आणखी असे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) अध्यादेश, २०१७ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त केलेला आणि त्या दिनांकास त्या पदावर कार्यरत असलेला भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी हा, या कलमाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त केला असल्याचे मानण्यात येईल.";

२०१७ चा महा. अध्या. १२.

(ग) पोट-कलम (३) मधील, " कार्यकारी अधिकारी" हा मजकूर, ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, " मुख्य कार्यकारी अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (४) मधील, " कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त " या मजकुराऐवजी " मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ङ) समासटीपेमधील, " कार्यकारी अधिकारी " या मजकुराऐवजी, " मुख्य कार्यकारी अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम १४ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मध्ये,–

(क) पोट-कलम (१) मधील, " कार्यकारी अधिकारी " या मजकुराऐवजी " मुख्य कार्यकारी अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मधील,–

(एक) " कार्यकारी अधिकारी " या मजकुराऐवजी " मुख्य कार्यकारी अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :–

" (क)(एक) आवश्यकता भासेल तेव्हा, कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची बदली करण्याचे ;

(दोन) समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचे;

(तीन) समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्याचे त्या समितीकडे निलंबन प्रस्तावित करण्याचे ;" ;

(तीन) खंड (ख) मधील, "पंचवीस हजार रुपयांहून" या मजकुराऐवजी, "पाच लाख रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (३) मधील, " कार्यकारी अधिकाऱ्याकडून " या मजकुराऐवजी, " मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :–

" (४) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, आकस्मिक निकडीच्या परिस्थितीत, ज्यांच्याकरिता त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात खर्चाची तरतूद केलेली नसेल आणि जे त्या विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तांच्या परिरक्षणासाठी किंवा त्या संस्थानाला भेट देणाऱ्या यात्रेकरुंच्या सेवेसाठी किंवा त्यांच्या सुरक्षेसाठी, त्याच्या मते तात्काळ पार पाडणे किंवा करणे आवश्यक असेल असे, पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाचे कोणतेही काम पार पाडण्याचा किंवा कोणतेही कार्य करण्याचा निदेश देता येईल आणि तसेच, असे काम पार पाडण्यासाठी किंवा ते कार्य करण्यासाठी लागणारी पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाची रक्कम, त्या विश्वस्त व्यवस्थेच्या निधीतून चुकती करता येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी, या कलमान्वये केलेल्या कार्यवाहीची माहिती त्याबद्दलच्या कारणांसह, समितीला मान्यतेसाठी ताबडतोब सादर करील.".

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ यामध्ये कलम १४क समाविष्ट करणे.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम १४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

श्री साईबाबा महासमाधी शतक महोत्सवी सोहळ्याच्या विकास योजनेची अंमलबजावणी करण्याचे अधिकार.

"१४क. शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्रमांक सांसवि २०१३/प्र.क्र. १/का.१६, दिनांक २२ ऑक्टोबर २०१३, अन्वये घटित केलेल्या कृति योजना समितीने यथोचितरित्या मंजूर केलेल्या श्री साईबाबा महासमाधी शतक महोत्सवी सोहळ्याच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या प्रस्तावांच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनासाठी,—

(क) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, पंचवीस लाख रुपयांपर्यंतच्या खर्चास मंजुरी देण्याचा अधिकार असेल ;

(ख) समितीला, एक कोटी रुपयांपर्यंतच्या खर्चास मंजुरी देण्याचा अधिकार असेल ; आणि

(ग) एक कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च अंतर्भूत असलेल्या प्रस्तावांना राज्य शासनाकडून मंजुरी देण्यात येईल.".

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ यामध्ये कलम १५ ची सुधारणा.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम १५ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील, "कार्यकारी अधिकारी" या मजकुराऐवजी, "मुख्य कार्यकारी अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (३) मधील, " कार्यकारी अधिकाऱ्याचे " या मजकुराऐवजी, " मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) समासटीपेमधील, " कार्यकारी अधिकारी " या मजकुराऐवजी " मुख्य कार्यकारी अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम १७ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम १७ मध्ये, पोट-कलम (२) च्या खंड (घ) मधील, "कार्यकारी अधिकाऱ्याला" या मजकुराऐवजी, "मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम १८ ची सुधारणा.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील, खंड (आठ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

"(आठ-क) राज्य शासनाने भारतीय महसुली सेवेमधून किंवा भारतीय लेखा परीक्षा आणि लेखा सेवेमधून नामनिर्देशित केलेला एक अधिकारी ;

(आठ-ख) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला, माहिती तंत्रज्ञान विभागामधील एक अधिकारी किंवा प्रतिनिधी;

(आठ-ग) प्रधान सचिव व विधि परामर्शी यांनी नामनिर्देशित केलेला असेल असा विधि व न्याय विभागाचा एक सह सचिव किंवा उप सचिव ;

(आठ-घ) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला, राज्य सेवेतील एक वास्तु विशारद किंवा समतूल्य अर्हता धारण करणारी व्यक्ती ;

(आठ-ङ) समितीने नामनिर्देशित केलेले श्री साईबाबांचे दोन भक्त;

(आठ-च) सह संचालक, नगर रचना, नाशिक ;";

(ख) पोट-कलम (३) मधील, "कार्यकारी अधिकारी" या मजकुराऐवजी, "मुख्य कार्यकारी अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१०. मुख्य अधिनियमाच्या कलम २३ मध्ये, "कार्यकारी अधिकारी" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे, त्या दोन्ही ठिकाणी, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, "मुख्य कार्यकारी अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २३ ची सुधारणा.

११. मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मध्ये, "उप सचिवाच्या" या मजकुराऐवजी, "सह सचिवाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २७ ची सुधारणा.

१२. मुख्य अधिनियमाच्या कलम २८ मध्ये,— सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २८ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मधील, "कार्यकारी अधिकारी" या मजकुराऐवजी, "मुख्य कार्यकारी अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, जे ठराव शासनाच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे, असे त्याला वाटत असेल, असे समितीचे ठराव शासनाकडे पाठवता येतील.";

(ग) पोट-कलम (२) मधील, "कार्यकारी अधिकाऱ्याचा किंवा समितीच्या कोणत्याही कार्यवाहीचा किंवा निर्णयाचा किंवा आदेशाचा" या मजकुराऐवजी, "मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा किंवा समितीच्या कोणत्याही कार्यवाहीचा किंवा ठरावाचा किंवा निर्णयाचा किंवा आदेशाचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल; आणि "कार्यकारी अधिकाऱ्याच्या किंवा समितीच्या अशा कोणत्याही निर्णयाची किंवा आदेशाची" या मजकुराऐवजी, "मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या किंवा समितीच्या कोणत्याही निर्णयाची, ठरावाची किंवा आदेशाची" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१३. मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मधील, पोट-कलम (१) मध्ये, "३० जूनच्या" या मजकुराऐवजी, "३० सप्टेंबरच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २९ ची सुधारणा.

१४. मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मध्ये,— सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ३० ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मधील, "कार्यकारी अधिकाऱ्याला" या मजकुराऐवजी, "मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) मधील, "कार्यकारी अधिकाऱ्याचे" या मजकुराऐवजी, "मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१५. मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ मध्ये, पोट-कलम (३) मधील, "जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसणाऱ्या" या मजकुराऐवजी, "विभागीय आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसणाऱ्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ३४ ची सुधारणा.

## निवेदन.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) या नावाने, शिर्डी येथे श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्थेचे शिर्डी संस्थान पुनर्घटित करण्यासाठी, आणि त्या विश्वस्तव्यवस्थेचे थेट राज्य शासनाच्या पर्यवेक्षणाखालील आणि नियंत्रणाखालील एका व्यवस्थापन समितीकडून प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी, आणि उक्त विश्वस्त व्यवस्थेला आपली धर्मादाय कार्ये अधिक प्रभावीपणे व कार्यक्षमरितीने पार पाडणे आणि त्यांच्या भक्तांकरिता अधिकाधिक सोयीसुविधांची तरतूद करणे आणि सर्वसामान्य लोकांकरिता त्यांच्या अतिरिक्त निधीतून व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे यांसाठी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४. (२००४ चा महा. १४) अधिनियमित करण्यात आला आहे.

२. उक्त अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे, भक्तांना आवश्यक त्या सोयीसुविधा देणे आणि ज्याकरिता त्या विश्वस्तव्यवस्थेचे या अधिनियमान्वये प्रशासन केले जाते त्या उद्दिष्टांकरिता आणि प्रयोजनांकरिता उक्त विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न वापरणे हे उक्त विश्वस्तव्यवस्थेच्या मुख्य आणि महत्त्वाच्या कर्तव्यांपैकी एक कर्तव्य आहे. साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीला भेट देणाऱ्या भक्तांच्या संख्येत सतत वाढ होत आहे, त्यामुळे शिर्डीमधील पायाभूत सुविधांची गरज वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा परिस्थितीत, भक्तांना अधिकाधिक पायाभूत सुविधा पुरविणे शक्य व्हावे म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम २१ मध्ये पोट-कलम (१अ) समाविष्ट करण्यात आले आहे.

३. आता, विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक १९८५६/२०१४ यामध्ये, माननीय सर्वोच्च न्यायालयाने, आपल्या दिनांक १७ फेब्रुवारी २०१७ रोजीच्या आदेशान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या कार्यकारी अधिकाऱ्याच्या पदावर भारतीय प्रशासन सेवेच्या संवर्गातील अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे निदेश दिले आहेत. त्यानुसार, राज्य शासनाने, कार्यकारी अधिकाऱ्याच्या पदावर भारतीय प्रशासन सेवेच्या संवर्गातील अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे, त्याच्या परिणामी, उक्त अधिनियमामध्ये विवक्षित सुधारणा करणे इष्ट आहे. त्याचप्रमाणे त्या विश्वस्तव्यवस्थेने, २०१७-२०१८ मध्ये श्री साईबाबांच्या समाधीचा शतक महोत्सवी वर्ष सोहळा आयोजित केला आहे.

४. वरील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तसेच २००४ या वर्षापासून सतत बदलणाऱ्या परिस्थितीत झालेल्या काही बदलांमुळे, उक्त अधिनियमाची कलमे २, ११(२), १३(२), १४, १५, १७(२), १८, २३, २७, २८, २९(१), ३० आणि ३४(३) यांमध्ये यथोचितरित्या आणखी सुधारणा करणे, आणि, उक्त अधिनियमामध्ये, त्याच्या कलम १४ मध्ये नवीन पोट-कलम (४) आणि कलम १४क समाविष्ट करणे इष्ट वाटते.

५. उक्त अधिनियमामध्ये करावयाच्या प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे नमूद केली आहेत,—

(एक) त्या विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यकारी अधिकाऱ्याच्या पदनामात, त्या विश्वस्तव्यवस्थेचा मुख्य कार्यकारी अधिकारी असा बदल करणे शक्य व्हावे म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम २ आणि इतर संबंधित कलमांमध्ये सुधारणा करणे ;

(दोन) व्यवस्थापन समितीच्या सभेची गणपूर्ती न झाल्यास, तिच्या तहकुबीसंबंधीची तरतूद करणे शक्य व्हावे म्हणून, कलम ११(२) मध्ये सुधारणा करणे ;

(तीन) विश्वस्तव्यवस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या पदावर, भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्याची निवड करणे शक्य व्हावे म्हणून, कलम १३(२) मध्ये सुधारणा करणे ;

(चार) समितीच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची बदली, शिस्तभंगाची कार्यवाही, निलंबन, इत्यादी संबंधीच्या तरतुदी करणे शक्य व्हावे म्हणून, कलम १४(२) मध्ये सुधारणा करणे ;

(पाच) ज्याकरिता त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात खर्चाची तरतूद केली नसेल आणि जे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी याच्या मालमत्तांच्या परिरक्षणासाठी किंवा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी येथे भेट देणाऱ्या यात्रेकरूंच्या सेवेसाठी किंवा त्यांच्या सुरक्षेसाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या मते तात्काळ पार पाडणे किंवा करणे आवश्यक असेल असे, पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाचे कोणतेही काम, आकस्मिक निकडीच्या परिस्थितीत, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीतून पार पाडणे किंवा करणे शक्य होण्याकरिता त्या व्यवस्थापन समितीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला विशेष अधिकार देणे शक्य व्हावे म्हणून, कलम १४ मध्ये नवीन पोट-कलम (४) जादा दाखल करून त्या कलमाची सुधारणा करणे ;

(सहा) श्री साईबाबा महासमाधी शतक महोत्सवी सोहळ्याच्या विकास योजनेच्या अंमलबजावणी करण्यासंबंधीच्या तरतुदी करणे शक्य व्हावे म्हणून अधिनियमात नवीन कलम १४क समाविष्ट करणे ;

(सात) सल्लागार परिषदेचे काम प्रभावीपणे होण्यासाठी, भारतीय महसुली सेवेतील किंवा भारतीय लेखापरीक्षा आणि लेखासेवेतील अधिकाऱ्याला, माहिती तंत्रज्ञान विभागातील अधिकाऱ्याला, विधि व न्याय विभागातील सह सचिवाला किंवा उप सचिवाला आणि राज्य सेवेतील वास्तुविशारदाला किंवा समकक्ष अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीला, त्या सल्लागार परिषदेचा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यासाठी राज्य शासनाला आणि श्री साईबाबांचे दोन भक्त सदस्य म्हणून नियुक्त करण्यासाठी व्यवस्थापन समितीला अधिकार प्रदान करण्यासाठी आणि सहसंचालक, नगररचना यास, तिचा एक सदस्य म्हणून नियुक्त करण्यासाठी अधिकार प्रदान करणे शक्य व्हावे म्हणून कलम १८(१) मध्ये सुधारणा करणे ;

(आठ) संस्थान विश्वस्तव्यवस्थेची जंगम किंवा स्थावर मालमत्ता, त्यासंबंधातील अभिलेख, पत्रव्यवहार, योजना, लेखे आणि दस्तऐवज यांची तपासणी, राज्य शासनाच्या आदेशाप्रमाणे, राज्य शासनाच्या उप सचिवाऐवजी सहसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याकडून पार पाडण्यात येईल, अशी तरतूद करणे शक्य व्हावे म्हणून कलम २७ मध्ये सुधारणा करणे ;

(नऊ) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, व्यवस्थापन समितीचे ठराव, शासनाकडे पाठविता येतील, अशी तरतूद करणे शक्य व्हावे म्हणून, कलम २८(१) मध्ये सुधारणा करणे ;

(दहा) विश्वस्तव्यवस्थेच्या वार्षिक अहवालाची प्रत, त्या वर्षाच्या ३० जून ऐवजी, त्या वर्षाच्या ३० सप्टेंबरच्या आत राज्य शासनास आणि धर्मादाय आयुक्ताला सादर करण्यात येईल अशी तरतूद करणे शक्य व्हावे म्हणून कलम २९(१) मध्ये सुधारणा करणे ;

(अकरा) जिल्हाधिकाऱ्यांऐवजी विभागीय आयुक्तांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल असे, राज्य शासनाच्या सक्रीय सेवेतील पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून किंवा जे अशा पदावरून निवृत्त झाले असतील अशा व्यक्तींमधून एखाद्या व्यक्तीची प्रशासक म्हणून नियुक्ती करणे शक्य व्हावे म्हणून कलम ३४(३) मध्ये सुधारणा करणे.

६. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ (२००४ चा महा. १४) यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १३ जुलै २०१७.

चे. विद्यासागर राव,
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नि. ज. जमादार,
शासनाचे प्रधान सचिव व विधि परामर्शी.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.